# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग


कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./१२६७/२०२३

दिनांक : २६/०६/२०२३

## अधिसुचना

विषय:– गोंडवाना विद्यापीठाच्या दहाव्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ:– विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकाशीत केलेली गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची यादी.
(जा.क्र.गो.वि./परीक्षा वि./१९१/२०२३, दिनांक २०/०४/२०२३ ची सुधारित अधिसुचना)

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठात दहावा दीक्षांत समारंभ बुधवार दि. ०५/०७/२०२३ रोजी आयोजीत करण्यात आलेला आहे. सत्र २०२१–२२ च्या विविध अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीतील सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते दीक्षांत समारंभात प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे. प्रथम गुणवत्ता व त्यापूढील क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना दीक्षांत सभारंभानतंर कार्यक्रम स्थळी प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे.

करीता संदर्भीय गुणवत्ता यादीमधील प्रथम गुणवत्ता व त्यापूढील क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांनी बुधवार दिनांक ०५/०७/२०२३ रोजी सकाळी ०८:०० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहामध्ये उपस्थित राहावे. त्याबाबत सर्व संबंधित प्राचार्यांनी संबंधित विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून कळवून सहकार्य करावे.
धन्यवाद!

सुचना:– १. समारंभाला येतांना ओळखपत्र, निमंत्रण पत्र, आधार कार्ड तथा सुरक्षा पोलीस पास सोबत आणणे अनिवार्य आहे.
२. सुरक्षा पोलीस पास दि. ०४/०७/२०२३ दुपारी ०४.००ते ०६.०० वाजेपर्यंत व दि.०५/०७/२०२३ सकाळी ०७.०० ते ०८. ०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा पुर्व विभागाकडून प्राप्त करून घ्यावे.
३. सभागृहामधील नियोजित जागी आपले स्थान ग्रहण करावे.
४. सभागृहामध्ये आपले भ्रमणध्वनी संच बंद ठेवावे.
५. विद्यापीठातील वित्त विभागातून अनामत रक्कम रू. २००/– भरून स्कार्फ प्राप्त करून घ्यावा.
६. Male graduands shall have white pant or pyjama or dhoti and white shirt, or white shirt with Jodhpuri Coat. Female graduands shall worn white saree with white blouse.

२७/६/२३
(देवेंद्र एम. झाडे)
संचालक (प्रभारी)
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रतीलिपी

१. मा. कुलगुरू, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
२. मा. प्र–कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
३. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर
५. संगणक विभाग, सदर अधिसुचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावे